REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# "नागपूरकर भोसल्यांच्या राज्यातील ब्राम्हणांचे योगदान"

प्रा. डॉ. बाळकृष्ण त्र्यंबक पाटील
इतिहास विभाग प्रमुख , किसान कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव.

## प्रस्तावना :

नागपूरकर भोसलेकालीन समाजात वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. समाजात वर्णव्यवस्थेचे प्राबल्य होते. त्यात ब्राम्हण समाजात प्रथम दर्जाचे स्थान प्राप्त केलेला वर्ण होता. ब्राम्हण वर्ण विद्याभ्यास करण्यात तरबेज होते. त्यांना राज्यकर्त्यांनीही राज्यकारभारात विविध पदावर नेमलेले तत्कालीन कागदपत्रांवरून दिसून येते. भोसल्यांच्या राज्यकारभारात ब्राम्हण वर्ण महसूल विभाग, अर्थ विभाग, लष्करी विभाग इत्यादी क्षेत्रातील जबाबदारी सांभाळून होते. मामलेदार, महसूल अधिकारी, हिशेबनीस इत्यादी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या या वर्गाकडे सोपविल्या होत्या.[१] यावरून ब्राम्हणांचे स्थान समाजात वरिष्ठ दर्जाचे होते यात शंकाच नाही.



रिचर्ड जेन्किन्स याने नागपूर राज्याच्या संबंधीचा तयार केलेल्या अहवालात असे म्हटले आहे की, ब्राम्हण वर्ग हा नागपूरच्या राज्यात मोठ्या प्रमाणावर होता. या ब्राम्हणांमध्ये शेतकरी, विद्वान, लेखक, सावकार आणि काही सैनिक व्यवसाय करणारे ब्राम्हण होते. परंतु बहुसंख्या ब्राम्हण धर्मविधी करून आपला उदरनिर्वाह चालवित होते.[२] असा उल्लेख त्यांच्या अहवालात दिलेला दिसतो. भोसल्यांच्या राज्यातील ब्राम्हणांच्या संदर्भात रिचर्ड जेन्किन्स यांनी काढलेले उद्गार लक्षात घेण्याजोगे आहेत. तो म्हणतो; ब्राम्हणवर्ग स्वभावाने अतिशय मायाळू आणि चालीरितीने संस्कारक्षम, वरिष्ठांच्या समोर अतिशय विनयतेने वागणारा इतर वर्णांच्या लोकांबरोबरही त्यांचे वागणे सभ्यतेचे होते. कोणालाही त्यांच्याविषयी स्वाभिमान वाटावा असे त्यांचे वर्तन असे. काही ब्राम्हण वरिष्ठांची स्तुती करणारे आढळून येतात.[३] काही ब्राम्हण भोसल्यांच्या दरबारातील वकील म्हणूनही काम करीत असत. त्या वकीलांमध्ये मुरारराव हा एक विश्वासपात्र व्यक्ती म्हणून ओळखला जाई. कोल ब्रुक याने गव्हर्नर वेलस्ली यांस ३१ जुलै १८०० रोजी पाठविलेल्या पत्रात मुरारराव वकीलाचा त्याने उल्लेख करून त्यांच्या संदर्भात गौरव उद्गार काढले आहेत.[४]

शिक्षणाच्या संदर्भात ब्राम्हणवर्ण हा अग्रेसर होता. ब्राम्हणांची मुले बहुतांशी मोठ्या संख्येने शिक्षण घेत होते. त्यामुळे त्यांच्या मुलांमध्ये नैतिकता आणि बुद्धीमत्ता यांची चांगलीच चुणूक असल्याचे दिसते. ब्राम्हणच वेदग्रंथांचे व इतर धर्मग्रंथांचे पठण करीत असत. हिंदू धार्मिकतेच्या संदर्भात ब्राम्हण वर्ग मोठा अभ्यासू होता. ब्राम्हणांना संस्कृत भाषा अवगत होती. शिवाय लेखन, वाचन आणि हिशेब तपासणे या सारख्या विविध कामात हा वर्ण मोठा अग्रेसर होता असे दिसून येते.[५]

### १) मुन्शी ब्राम्हण -

नागपूरकर भोसल्यांच्या राज्यात ब्राम्हण वर्णाच्या व्यक्तींना त्यांच्या गुणवत्तेनुसार विविध पदांवर नेमण्यात येत असे. त्यात काही ब्राम्हणांना मुन्शी म्हणून नेमण्यात आले होते. रघुजी भोसले यांच्या कारकिर्दीत त्यांनी गंगाजी गोपाल या ब्राम्हणांस मुन्शी पदावर नेमल्याचे तत्कालीन कागदपत्रांवरून दिसून येते.[६] नागपूरकर भोसल्यांच्या मुन्शीपदावर भवानी पंत व भवानी काळो हे कारभारात प्रमुख म्हणून होते.[७]

### २) सुभेदार ब्राम्हण -

नागपूर राज्यातील काही ब्राम्हणांना सुभ्याचा प्रमुख सुभेदार म्हणूनही नेमण्यात आलेले दिसते. व्यंकोजी भोसल्यांच्या कारकिर्दीत नारो रघुनाथ यांस सुभेदारी देऊन त्याजकडे सुभेदारीचा कारभार सोपविलेला होता. रघुजी भोसल्यांच्या काळात चंद्रपूरच्या सुभेदारीवर सुभेदर म्हणून महिपतरावांचे बंधु राजोबा यांस

नेमलेले दिसून येते.[८] इ.स. १७७८ या वर्षी सेनासाहेब सुभा यांनी विठ्ठलपंत यास सुभेदारी पदावर नेमल्याचे आढळून येते.[९] या सुभेदारास समाजात शांतता व सुव्यस्था ठेवण्याची जबाबदारी पार पाडावी लागत असे.

### ३) वेदशास्त्रीय ब्राम्हण -

ब्राम्हण वेदांचे पठण करून समाजात वैदिक विधी करणे, धर्मशास्त्र ग्रंथांचे वाचन करणे हा मुळ उद्देश या वर्णाचा होता. त्यामुळे या वर्णाला धार्मिक क्षेत्रात व सामाजिक जीवनात मोठे मानाचे स्थान होते.[१०] वेदात पारंगत असलेल्या ब्राम्हणांनाही भोसले दान म्हणून दक्षिणा देत असल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होते.[११] वेदांचे पठण करणे शिवाय इतरांना वेद शिकविणे ही कामे या वर्गाची होती.[१२] वेदशास्त्र संपन्न नरसोबा जोशी यास भोसल्यांनी ३५० रूपयांचे वर्षासन दिले. दरसाल वर्षासन घेत जाऊन भोसल्यांची स्नानसंध्या मंत्रानी करावी. त्याचप्रमाणे राज्यास अभिष्टचिंतन करीत जावे. असे अप्रकाशित कागदपत्रांत आढळून येते.[१३]

### ४) सावकार ब्राम्हण -

भोसल्यांच्या नागपूर राज्यात काही ब्राम्हण सावकारीचा व्यवसाय करित होते. त्यात लक्ष्मीकांत नाईक हे एक होते. सर्व सावकारांमध्ये त्यांना मानाचे स्थान होते. व्यंकोजी नाईक या यजुर्वेदीय ब्राम्हणांना सावकारांमध्ये अतिशय उच्च दर्जाचे स्थान होते. शिवाय मुरार नाईक, गडकरी, गंगाजी नाईक गडकरी या सारख्या सावकारांचा उल्लेख करता येईल. ब्राम्हण सावकारांपैकी बरेच सावकार यजुर्वेदीय होते.[१४] नागपूर राज्यात जे ब्राम्हण सावकार होते, त्यांचे नागपूरात पेठा, दुकाने वगैरे होती. अशा सावकारांमध्ये रघुनाथपंत हरि पटवर्धन हे कान्होजी भोसल्यांचे सावकार होते. परंतु पुढे देण्या-घेण्याच्या व्यवहारावरून त्यांनी कान्होजींचा पक्ष सोडून दिला. पहिला रघुजीचा पक्ष घेतला होता. कान्होजींच्या पतनास पटवर्धन सावकार कारणीभूत असल्याने सांगितले जाते.[१५] मुधोजी भोसले यांच्या कारकिर्दीत जे सावकार म्हणून ब्राम्हण होते, त्यात उदयपुरी गोसावी हा श्रीमंत सावकार नागपूर येथे वास्तव्य करून होता. मुधोजी भोसल्यांनी या सावकाराकडून ५० लक्ष रूपये कर्ज घेतल्याचे दिसून येते.[१६]

### ५) भोसल्यांचे ब्राम्हण मंत्री -

रघुजी भोसले व इतर भोसल्यांच्या काळात जे ब्राम्हण मंत्री नेमण्यात आलेले होते. श्रीधर पंडीत हे भोसल्यांच्या विश्वासू मंत्र्यांपैकी एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून ओळख होती. प्रत्येक महत्त्वाच्या गुजगोष्टी प्रसंगी भोसले श्रीदर पंडीतांशी गुप्त बैठक घेवून बोलणी करीत असत. त्यामुळे श्रीधर पंडीत यांचे भोसल्यांबरोबरचे संबंध अतिशय विश्वासाचे होते.

भोसल्यांच्या दरबारातील मंत्र्यांमध्ये गुजाबा दादा व श्रीधर पंडीत हेच महत्त्वाचे मंत्री होते.[१७] भोसल्यांच्या ब्राम्हण मंत्र्यांमध्ये नारायण पंडित आणि नागो पंडित हे दोन ब्राम्हण अतिशय मानाचे स्थान मिळवून होते.[१८] हे दोघेही ब्राम्हण मंत्री अतिशय विद्वत्तापूर्ण आणि विश्वासातले होते.

### ६) ब्राम्हण वतनदार -

ब्राम्हण वर्णाच्या व्यक्तींना नागपूरच्या भोसल्यांकडून वतन देण्यात आले होते. जानोजी भोसले यांनी त्यांच्या कारकिर्दीतील नागपूर येथील जोशीपणाचे वतन हिरिभट जोशी यांना दिल्याचे आज्ञापत्रावरून समजते.[१९] भोसल्यांच्या काळात नागपूर राज्याच्या विविध गावांमध्ये काही ब्राम्हणांकडे ग्रामजोशी हे वतन दिलेले होते.[२०] नागपूरच्या राज्यातील देवगड भागोरी, मालवी, नार्मदी, चेऊखा येथे ब्राम्हण वास्तव्याला होते. येथील सर्व 'वतनदार' लोक ब्राम्हणच होते.[२०] असा स्पष्ट उल्लेख तत्कालीन कागदपत्रांत केलेला आढळून येतो.

### ७) वैद्यकीय ब्राम्हण -

नागपूर येथील काही ब्राम्हण वर्णाचे लोक वैद्यकीय व्यवसाय करीत असत. त्यांना 'वैद्यकीय ब्राम्हण' म्हणून समजले जाई.[२१] रघुजी भोसल्यांच्या काळात नागपूर येथे विश्वनाथ ब्राम्हण हा वैद्यकीय व्यवसाय करीत होता. त्याने रघुजी भोसल्यांना त्यांच्या आजारासाठी औषधी दिल्याचा उल्लेख सापडतो.[२२]

### ८) ज्योतिषी ब्राम्हण -

भोसल्यांच्या राज्यातील समाज जीवनात ब्राम्हण वर्णापैकी काही लोक ज्योतीषीचा व्यवसाय करीत असत. ज्योतिषी ब्राम्हणांचे कार्य पंचांग पाहून विवाहाचा मुहूर्त, तिथी, वार, नक्षत्र ठरविणे कार्यासाठी शुभदिवस सांगणे इत्यादी भोसल्यांचाही अशा मुहूर्तावर विश्वास होता. त्यामुळे भोसलेही ज्योतिर्षीनी ठरवून दिलेल्या मुहूर्तावर महत्त्वाची कामे हाती घेत असत.[२३]

### ९) भोसल्यांचे ब्राम्हण अधिकारी -

भोसल्यांच्या दरबारात अनेक ब्राम्हण वर्णाच्या व्यक्ती अधिकारी म्हणून सेवेत होते. त्यापैकी नारोबा काळीकर हा ऋग्वेदी ब्राम्हण भोसल्यांच्या प्रमुख सल्लागारांपैकी एक होता. त्याचे जमीन महसुलाच्या विभागाशी संबंध होते. सदोबा आबा देव हा राज्यांच्या तिजोरीचा प्रमुख होता. त्यावेळी भोसल्यांच्या खजिन्याची जबाबदारी स्विकारली होती. रामजीपंत कुऱ्हू हा जडजवाहीर, हिरे, माणके, सोने, चांदी यांची शुद्धता व अशुद्धता तपासणे ही जबाबदारी होती. अमृतराव पांडूरंग हा ऋग्वेदीय ब्राम्हण भोसल्यांच्या राज्यात बक्षी या पदावर होता. विठ्ठलपंत या ब्राम्हणाकडे बारगीराकडील घोड्याची व भोसल्यांच्या पागांतील घोड्याची देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.[२४] वरील वृत्तांतावरून नागपूर राज्यातील ब्राम्हण वर्णाच्या अनेक व्यक्ती भोसल्यांच्या दरबारात अधिकारी, प्रमुख अधिकारी पदावर होते. यावरून त्यांचे योगदान स्पष्ट होते.

### १०) निष्कर्ष -

नागपूरकर भोसल्यांच्या राज्यातील समाजजीवनाची वैशिष्ट्ये म्हणजे त्या काळात तत्कालीन समाजातील ब्राम्हण प्रमुख वर्ण होता. ब्राम्हणांना समाजात उच्च दर्जा मिळालेला होता. ब्राम्हण वर्ण विद्या अभ्यास करण्यात तरबेज असल्यामुळे त्यांना राज्यकर्त्यांनीही राज्यकारभारात विविध पदावर नेमलेले दिसून येते. नागपूरकर भोसल्यांच्या राज्यात ब्राम्हण वर्णाच्या व्यक्तींना त्यांच्या गुणवत्तेनुसार विविध पदांवर नेमण्यात येत असे. त्यात काही ब्राम्हणांना राज्यात मुन्शी, दिवाण, कारभारी तर इतरांना बक्षी म्हणून नेमण्यात आलेले होते. काही ब्राम्हण भोसल्यांचे मंत्री म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडलेली दिसून येते. भोसल्यांच्या राज्यात ज्योतिषी ब्राम्हणांना अतिशय मान सन्मानाने वागवले जात होते. भोसल्यांच्या राज्यातील महत्त्वाचे विभाग, पदे व विविध अधिकार पदे जबाबदार ब्राम्हणांकडे सोपविलेली होती यात शंका नाही.

### संदर्भ ग्रंथ


१) Richard Jankins, Report on the Territories of the Raja of Nagpur, 1816, Govt. Press, Nagpur, P. No. 13.
२) उपरोक्त, पृ. क्र. १३.
३) उपरोक्त, पृ. क्र. २८.
४) Kale Y.M. (Edited by), Nagpur Affairs (1781-1820), Vol-V, English Records of Maratha History, Bombay, 1938, Letter No. 38, P. No. 54, 55.
५) Richard Jankins, Report on the Territories of the Raja of Nagpur, 1816, Govt. Press, Nagpur, P. No. 35.
६) सरदेसाई गो.स. (संपादक), पेशवे दप्तरातून निवडलेली कागदपत्रे, नागपूरकर भोसल्यांची कामगिरी, खंड - २० (१७१७-१७७४) गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३२, पत्र क्र. ६८, पृ.क्र. ५८.
७) काळे यादव माधव, नागपूरकर भोसल्यांच्या इतिहास, मध्य प्रांत संशोधन मंडळ, द्वितीयावृत्ती, नागपूर १९७९, पृ.क्र. १२५.
८) ओक वामन दाजी, नागपूरकर भोसल्यांची बखर (शके - १८०७), मध्य प्रांत संशोधन मंडळ, नागपूर पृ.क्र. ९२.
९) शेजवलकर त्र्यंबकर शंकर, नागपूर अफेअर्स, खंड - I, १९५४, पुणे, पत्र क्र. ६८, पृ.क्र. ८२.
१०) Richard Jankins, Report on the Territories of the Raja of Nagpur, 1816, Govt. Press, Nagpur, P. No. 37.
११) साने काशिनाथ नारायण, नागपूरकर भोसल्यांच्या संबंधीचे कागदपत्रे, डेक्कन कॉलेज, पुणे, (शके १८११०, लेखांक क्र. १२, पृ.क्र. ३८.
१२) लांडगे दे.गो., नागपूरचा सांस्कृतिक इतिहास, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, प्रथम आवृत्ती, नागपूर, १९५४, पृ ४२.
१३) विदर्भ पुरालेखागार, नागपूर, भोसलेकालीन अप्रकाशित मोडी कागदपत्रे, क्र. १.
१४) काळे यादव माधव, नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, मध्यप्रांत संशोधन मंडळ, द्वितीयावृत्ती, नागपूर, १९७९, पृ.क्र. २६३.
१५) गद्रे प्रभाकर, नागपूर राज्याचा उदय आणि आस्थापना, श्री मंगेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपूर २००१, पृ.क्र. २५६.
१६) अंधारे भालचंद्र रामचंद्र, (लेखक) सेनाधुरंधर मुधोजी भोसले (१७३५-१७८८), विश्वभारती प्रकाशन, प्रथम आवृत्ती, नागपूर, २००६, पृ. २११.
१७) Sinha H.N., Selections from the Nagpur Residency Records, Vol. II, (1807-1811), Letter No. - 11, Page No. 13.
१८) Kale Y.M., Nagpur Affairs, Vo. - V, Letter No. 64-66, Page No. 94-97.

१९) Sinha H.N., Selections from the Nagpur Residency Records, Vol. II, (1807-1811), Letter No. 98, Page No. 178.
२०) अंधारे भा.रा. (संपादक), अखेरचा सेनासाहेब सुभा, विश्वभारती प्रकाशन, प्रथमावृत्ती, नागपूर, २००३, पृ.क्र. ७२.
२१) लांडगे दे.गो., नागपूरचा सांस्कृतिक इतिहास, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, प्रथम आवृत्ती, नागपूर, १९५४, पृ १८.
२२) सरदेसाई गो.स. (संपादक), पेशवे दप्तरातून निवडलेली कागदपत्रे, नागपूरकर भोसल्यांची कामगिरी, खंड - २०, (१७१७-१७७४) गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३२, पत्र क्र. २६, पृ.क्र. १८.
२३) पुरंदरे गोविंद मार्तंड, नागपूर भोसलेशाहीतील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, नागपूर, १९८४, पृ ४५.
२४) 1811 A Sketch of The History of the Bhonsla Family Taken from an old Female Domestic of the Palace Together with an Account of his Administration, Page No. 7.

LBP PUBLICATION